भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ७४)

[१ ऑक्टोबर, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Central Sales Tax Act, 1956

## (Act No. 74 of 1956)

[As in force on the 1st October, 1978]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले

१९८१

[किंमत ९० पैसे]

## विशोधन अधिनियमांची सूची

१. १९५८ चा अधिनियम क्रमांक ३१.

२. १९६१ चा अधिनियम क्रमांक १४.

३. १९६३ चा अधिनियम क्रमांक ८.

४. १९६६ चा अधिनियम क्रमांक १३.

५. १९६८ चा अधिनियम क्रमांक ५.

६. १९६८ चा अधिनियम क्रमांक १९.

७. १९६९ चा अधिनियम क्रमांक २८.

८. १९७२ चा अधिनियम क्रमांक ६१.

९. १९७५ चा अधिनियम क्रमांक २५.

१०. १९७६ चा अधिनियम क्रमांक १०३.

# केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

**प्रारंभिक**

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.


### प्रकरण २ रे

**आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात अथवा राज्याबाहेर अथवा आयातीच्या किंवा निर्यातीच्या ओघात मालाची विक्री किंवा खरेदी केव्हा होते हे ठरवण्याबाबतची तत्त्वे सूत्रबद्ध करणे**


३. मालाची विक्री किंवा खरेदी आंतरराज्यीय व्यापाराच्या किंवा वाणिज्यव्यवहाराच्या ओघात होते असे केव्हा म्हणावयाचे.

४. मालाची विक्री किंवा खरेदी राज्याच्या बाहेर होते असे केव्हा म्हणावयाचे.

५. मालाची विक्री किंवा खरेदी आयातीच्या किंवा निर्यातीच्या ओघात होते असे केव्हा म्हणावयाचे.


### प्रकरण ३ रे

**आंतरराज्यीय विक्रीकर**


६. आंतरराज्यीय विक्रीव्यवहारांवरील कर भरण्याचे दायित्व.

६क. विक्रीद्वारे नव्हे तर अन्यथा मालाचे हस्तांतरण घडले असा दावा केल्यास त्या बाबतीत शाबितीचा भार, इत्यादी.

७. व्यापाऱ्यांची नोंदणी.

८. आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार यांच्या ओघात होणाऱ्या विक्रीव्यवहारांवरील कराचे दर.

८क. उलाढाल निश्चित करणे.

९. कर बसवणे व त्याची उगराणी करणे आणि दंड.

९क. कराची उगराणी फक्त नोंदलेल्या व्यापाऱ्यांनीच करावयाची.

९ख. कर, इ. पूर्णांकित करणे.

१०. दंड.

१०क. खटल्याऐवजी दंड बसवणे.

११. गुन्ह्यांची दखल घेणे.

१२. दायित्वनिराकरण.

१३. नियम करण्याची शक्ती.


### प्रकरण ४ थे

**आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांमधील विशेष महत्त्वाचा माल**


१४. विवक्षित माल आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांमध्ये विशेष महत्त्वाचा असणे.

१५. घोषित मालाची राज्यांतर्गत विक्री किंवा खरेदी यांवरील कराच्या संबंधातील निर्बंध व शर्ती.


### प्रकरण ५ वे

**विशेष प्रकरणांतील दायित्व**


१६. व्याख्या.

१७. समापन-अवस्थेतील कंपनी.

१८. समापन-अवस्थेतील खाजगी कंपनीच्या संचालकांचे दायित्व.

# केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६

## १९५६ चा अधिनियम क्रमांक ७४[1]

[२१ डिसेंबर, १९५६.]

आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात अथवा राज्याबाहेर अथवा भारतामध्ये होणाऱ्या आयातीच्या किंवा भारताबाहेर होणाऱ्या निर्यातीच्या ओघात मालाची विक्री किंवा खरेदी केव्हा होते हे ठरवण्याबाबतची तत्त्वे सूत्रबद्ध करण्यासाठी, आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात होणाऱ्या मालविक्रीवर कर बसवणे, त्याची उगराणी करणे व तो वितरित करणे यांबाबत उपबंध करण्यासाठी आणि आंतरराराज्यीय व्यापारात किंवा वाणिज्यव्यवहारात विवक्षित माल विशेष महत्त्वाचा म्हणून घोषित करून अशा विशेष महत्त्वाच्या मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर कर बसवणारे राज्याचे कायदे ज्यांना अधीन असतील ते निर्बंध व शर्ती विनिर्दिष्ट करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार [2]* * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [3]दिनांकास तो अंमलात येईल, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "समुचित राज्य" याचा,—

(एक) ज्याच्या धंद्याच्या एक किंवा अनेक जागा एकाच राज्यात आहेत त्या व्यापाऱ्याच्या संबंधातील **अर्थ,** ते राज्य असा आहे ;

(दोन) ज्याच्या धंद्याच्या [4]* * * जागा वेगवेगळ्या राज्यांमध्ये आहेत त्या व्यापाऱ्याच्या संबंधातील अर्थ, आपापल्या क्षेत्रात असलेल्या जागेबाबत किंवा जागांबाबत असे प्रत्येक राज्य असा आहे ;

[5]* * * * *

[6][(कक्) "धंदा" यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे—

(एक) कोणताही उदीम, वाणिज्यव्यवहार किंवा वस्तुनिर्मिती अथवा उदीम, वाणिज्यव्यवहार किंवा वस्तुनिर्मिती या स्वरूपाचा कोणताही प्रोद्यम किंवा कार्यसंस्था — मग असा उदीम, वाणिज्यव्यवहार, वस्तुनिर्मिती, प्रोद्यम किंवा कार्यसंस्था ही लाभाच्या किंवा नफ्याच्या हेतूने चालवलेली असो वा नसो — आणि असा उदीम, वाणिज्यव्यवहार, वस्तुनिर्मिती, प्रोद्यम किंवा कार्यसंस्था यांमधून कोणताही लाभ किंवा नफा उपार्जित होवो वा न होवो —; आणि

(दोन) असा कोणताही उदीम, वाणिज्यव्यवहार, वस्तुनिर्मिती, प्रोद्यम किंवा कार्यसंस्था यांच्याशी निगडित अथवा त्यांना आनुषंगिक किंवा साहाय्यभूत असा कोणताही संव्यवहार ;

(कख्) "भारताच्या सीमाशुल्क सरहद्दी ओलांडणे" याचा अर्थ, आयात माल किंवा निर्यात माल सीमाशुल्क प्राधिकरणांकडून मोकळा केला जाण्यापूर्वी सीमाशुल्क ठाण्याच्या ज्या क्षेत्रामध्ये तो ठेवला जातो त्या क्षेत्राच्या सीमा ओलांडणे असा आहे ;

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, "सीमाशुल्क ठाणे" व "सीमाशुल्क प्राधिकरणे" यांना 'सीमाशुल्क अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५२) यामध्ये दिल्याप्रमाणे अर्थ असतील.]

---

१. १९६२ चा विनियम १२-कलम ३ व अनुसूची यांद्वारे (आपरिवर्तनांसह) गोवा, दमण व दीव यांवर, १९७२ चा अधिनियम ६१-कलम १४(१) द्वारे (५ ऑगस्ट, १९७१ रोजी अंमलात असल्याप्रमाणे) नागालँडच्या कोहिमा व मोकोकचुंग या जिल्ह्यांवर (३० नोव्हेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून) हा अधिनियम विस्तारित करण्यात आला. १९७२ चा अधिनियम ६१ याद्वारे या अधिनियमात केलेली विशोधने उक्त जिल्ह्यांमध्ये १ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून अंमलात आली. [पहा कित्ता—कलम १४(२)].

२. १९६८ चा अधिनियम ५-कलम २ द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द गाळले. (१३ मार्च, १९५८ रोजी व तेव्हापासून).

३. ५ जानेवारी, १९५७-कलम १५ खेरीजकरून सर्व कलमे-पहा, अधिसूचना क्र. एस्. आर. ओ. ७८, दि. ४ जानेवारी १९५७–**भारताचे राजपत्र,** असाधारण, १९५७-भाग दोन-विभाग ३, पृ. ५७; आणि कलम १५ हे १ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून अंमलात आले-पहा, अधिसूचना क्र. जी.एम.आर. ८९७, दि. २३ सप्टेंबर, १९५८–**भारताचे राजपत्र,** असाधारण १९५८–भाग दोन-विभाग ३(एक), पृ. ४७६.

४. १९५८ चा अधिनियम ३१-कलम २ द्वारे "एक किंवा अधिक" हे शब्द वगळण्यात आले. (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम २ द्वारे स्पष्टीकरण गाळले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

६. १९७६ चा अधिनियम १०३-कलम २ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१][(ख्) "व्यापारी" याचा अर्थ, जी व्यक्ती रोख रकमेबद्दल किंवा आस्थगित प्रदानांबद्दल अथवा कमिशन, पारिश्रमिक किंवा अन्य मूल्यवान प्रतिफल याबद्दल प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, माल खरेदी करण्याचा, विकण्याचा, पुरवण्याचा किंवा वितरित करण्याचा (नियमितपणे किंवा अन्यथा) धंदा करते अशी कोणतीही व्यक्ती असा आहे, आणि यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश आहे :--

(एक) असा धंदा चालवणारे स्थानिक प्राधिकरण, निगम-निकाय, कंपनी, अशी कोणतीही सहकारी संस्था किंवा अन्य संस्था, क्लब, पेढी, हिंदू अविभक्त कुटुंब किंवा अन्य व्यक्तिसंघ ;

(दोन) जो वखारिया, दलाल, कमिशन एजंट, हमीदारी एजंट किंवा अन्य कोणताही व्यापारी एजंट--मग तो कोणत्याही नावाने संबोधला जावो आणि यात यापूर्वी नमूद केलेल्या वर्णनाबरहुकूम असो वा नसो,--कोणत्याही प्रकर्त्याचा--मग तो प्रकट असो वा नसो--माल विकत घेणे, विकणे, पुरवणे किंवा वितरित करणे हा धंदा चालवतो तो ; आणि

(तीन) जो लिलावकार, कोणत्याही प्रकर्त्याचा--मग तो प्रकट असो वा नसो आणि इच्छुक खरेदीदाराने देऊ केलेली किंमत त्याने मान्य केलेली असो व प्रकर्त्याने मान्य केलेली असो वा प्रकर्त्याने नामनियुक्त केलेल्या व्यक्तीने मान्य केलेली असो--माल विकण्याचा किंवा त्याचा लिलाव करण्याचा धंदा चालवतो तो लिलावकार.

**स्पष्टीकरण १.**--कोणत्याही राज्यामध्ये जी जी व्यक्ती त्या राज्याच्या बाहेर राहणाऱ्या एखाद्या व्यापाऱ्याचा एजंट म्हणून काम करते आणि त्या राज्यामध्ये माल विकत घेते, विकते, पुरवते किंवा वितरित करते अथवा अशा व्यापाऱ्याच्या वतीने--

(एक) 'मालविक्रय अधिनियम, १९३०' (१९३० चा ३) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व्यापारी एजंट म्हणून, किंवा

(दोन) माल किंवा मालाशी संबंधित हक्कलेख याबाबत व्यवहार करणारा एजंट म्हणून, किंवा

(तीन) मालाच्या विक्रीच्या किंमतीची उगराणी करणे किंवा ती देणे यासाठी एजंट म्हणून किंवा अशी उगराणी किंवा भरणा करण्याबद्दल हमीदार म्हणून

काम करते ती प्रत्येक व्यक्ती, आणि एखाद्या राज्याच्या बाहेर नोंदणी झालेल्या पेढीची त्या राज्यातील प्रत्येक स्थानिक शाखा किंवा कार्यालय अथवा ज्यांचे प्रधान कार्यालय किंवा मुख्यालय त्या राज्याच्या बाहेर आहे अशी कंपनी किंवा निगम-निकाय हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ व्यापारी असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.**--जे शासन जादा शिल्लक, निरुपयोगी किंवा जुन्या वस्तू किंवा सामान अथवा टाकाऊ उत्पादने अथवा अप्रचलित वा मोडीत काढलेली यंत्रसामग्री किंवा तिचे भाग वा उपसाधने यांच्या संबंधातील कोणतीही विक्री, पुरवठा किंवा वितरण खेरीजकरून एरव्ही, रोख रकमेच्या किंवा आस्थगित प्रदानाच्या अथवा कमिशन, पारिश्रमिक किंवा अन्य मूल्यवान प्रतिफल याच्या बदल्यात प्रत्यक्षपणे किंवा अन्यथा माल विकत घेते, विकते, पुरवते किंवा वितरित करते--मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो--ते या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ व्यापारी असल्याचे मानण्यात येईल.]

(ग्) "घोषित माल" याचा अर्थ, कलम १४ खाली आंतरराज्यीय व्यापारात किंवा वाणिज्य-व्यवहारात विशेष महत्त्वाचा म्हणून घोषित केलेला माल असा आहे ;

(घ्) "माल" यामध्ये सर्व सामग्री, वस्तू, विकाऊ जिन्नस आणि अन्य सर्व प्रकारची जंगम संपत्ती यांचा समावेश होतो, पण [२][वर्तमानपत्रे,] कारवाईयोग्य मागणीहक्क, पुंजरोखे, शेअर्स व रोखे यांचा समावेश होत नाही ;

[२][(घ्घ्) "धंद्याची जागा" यामध्ये पुढील जागा समाविष्ट आहेत--

(एक) एखादा व्यापारी एजंटामार्फत (मग त्याला कोणत्याही नावाने संबोधले जावो) धंदा चालवतो अशा कोणत्याही बाबतीत, अशा एजंटाच्या कामकाजाची जागा ;

(दोन) जेथे एखादा व्यापारी आपल्या मालाची साठवण करतो ती वखार, गुदाम किंवा अन्य जागा ; आणि

(तीन) जेथे एखादा व्यापारी आपली हिशेब-पुस्तके ठेवतो ती जागा; ]

(ङ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(च्) "नोंदलेला व्यापारी" याचा अर्थ, कलम ७ खाली ज्याची नोंदणी झालेली आहे तो व्यापारी असा आहे ;

(छ्) "विक्री" या शब्दाचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसुद्धा त्याचा अर्थ, रोख रकमेबद्दल किंवा आस्थगित प्रदानाबद्दल किंवा अन्य कोणत्याही मूल्यवान प्रतिफलाबद्दल एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीकडे केलेले मालातील मालकीहक्काचे कोणतेही हस्तांतरण असा आहे, आणि भाडे-खरेदी तत्त्वावर किंवा हप्तेबंदीने पैसे देण्याच्या अन्य पद्धतीनुसार केलेले मालाचे हस्तांतरण त्यामध्ये समाविष्ट आहे, पण मालाचे गहाण किंवा तारणगहाण किंवा त्यावरील प्रभार किंवा तारण त्यामध्ये समाविष्ट नाही ;

---

१. १९७६ चा अधिनियम १०३-कलम २ द्वारे खंड (ख) ऐवजी घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५८ चा अधिनियम ३१-कलम २ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

(ज्) "विक्रीची किंमत" याचा अर्थ, कोणत्याही मालाच्या विक्रीबद्दलचे प्रतिफल म्हणून व्यापाऱ्याला द्यावयाची रक्कम **वजा** त्या व्यापारधंद्यात सामान्यत: प्रचलित असलेल्या शिरस्त्यानुसार रोख वटाव म्हणून मजरा घातलेली कोणतीही रक्कम असा आहे, पण जेथे वाहतुकीचा किंवा सुपूर्दगीचा खर्च किंवा प्रतिष्ठापनेचा खर्च वेगळा आकारला जातो अशा बाबतीत, त्याहून अन्य अशी जी कोणतीही रक्कम व्यापाऱ्याने मालाच्या सुपूर्दगीच्या वेळी किंवा तत्पूर्वी त्याबाबत केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल आकारली जाईल ती त्या रकमेमध्ये समाविष्ट आहे ;

(झ्) "विक्रीकर कायदा" याचा अर्थ, सरसकट मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर किंवा त्याबाबतीत स्पष्टपणे नमूद केलेल्या कोणत्याही विनिर्दिष्ट मालावर कर बसवण्यासाठी उपबंध करणारा कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या भागात त्या त्या काळी अंमलात असणारा कोणताही कायदा असा आहे आणि "सर्वसाधारण विक्रीकर कायदा" याचा अर्थ, राज्यामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये सरसकट मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर कर बसवण्यासाठी उपबंध करणारा, त्या त्या काळी अंमलात असणारा कायदा असा आहे ;

(ञ्) "उलाढाल" हा शब्द या अधिनियमाखाली कर देण्यास दायी असणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याच्या संबंधात वापरला असताना त्याचा अर्थ, आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात कोणत्याही विहित कालावधीमध्ये केलेल्या कोणत्याही मालाच्या विक्रीच्या संबंधात त्याला मिळालेल्या व मिळावयाच्या [1][आणि हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधांनुसार ठरवलेल्या] विक्री किंमतींची एकवट असा आहे ;

(ट्) "वर्ष" याचा व्यापाऱ्याच्या संबंधातील अर्थ, समुचित राज्याच्या सर्वसाधारण विक्रीकर कायद्याखाली त्याच्या संबंधात लागू असणारे वर्ष आणि असे कोणतेही वर्ष नसेल तेथे वित्तीय वर्ष असा आहे.

## प्रकरण २ रे

### आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात अथवा राज्याबाहेर अथवा आयातीच्या किंवा निर्यातीच्या ओघात मालाची विक्री किंवा खरेदी केव्हा होते हे ठरवण्याबाबतची तत्त्वे सूत्रबद्ध करणे

**मालाची विक्री किंवा खरेदी आंतरराज्यीय व्यापाराच्या किंवा वाणिज्य-व्यवहाराच्या ओघात होते असे केव्हा म्हणावयाचे.**

३. जर मालाची विक्री किंवा खरेदी—

(क्) यामुळे एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये मालाची ने-आण घडली तर ; किंवा

(ख्) ही, मालाची ने-आण एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये करताना मालाच्या हक्कलेखांच्या हस्तांतरणाद्वारे घडवून आणली तर,

ती विक्री किंवा खरेदी आंतरराज्यीय व्यापाराच्या किंवा वाणिज्यव्यवहाराच्या ओघात घडली असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण १.**—माल रवाना करण्यासाठी तो परिवाहकाकडे किंवा उपनिहितीकडे सुपूर्द केला जाईल त्या बाबतीत, खंड (ख्) च्या प्रयोजनार्थ मालाची ने-आण अशा सुपूर्दगीच्या वेळी सुरू झाली आणि अशा परिवाहकाकडून किंवा उपनिहितीकडून सुपूर्दगी जेव्हा स्वीकारली जाईल त्यावेळेस ती संपली असे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.**—मालाची ने-आण जेथे सुरू होते त्याच राज्यात संपते तेव्हा, अशा ने-आणीच्या ओघात तो माल दरम्यान अन्य कोणत्याही राज्याच्या क्षेत्रातून न्यावा लागला एवढ्याच केवळ कारणावरून ती एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये केलेली मालाची ने-आण असल्याचे मानण्यात येणार नाही.

**मालाची विक्री किंवा खरेदी राज्याच्या बाहेर होते असे केव्हा म्हणावयाचे.**

४. (१) कलम ३ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, जेव्हा मालाची विक्री किंवा खरेदी पोटकलम (२) च्या अनुसार राज्यामध्ये झाली असल्याचे ठरवले जाईल तेव्हा, अशी विक्री किंवा खरेदी ही अन्य सर्व राज्यांच्या बाहेर झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) जर—

(क्) विनिर्दिष्ट किंवा विनिश्चित मालाच्या बाबतीत, विक्रीची संविदा केली त्यावेळी ; आणि

(ख्) अविनिश्चित किंवा भावी मालाच्या बाबतीत विक्रेत्याने किंवा खरेदीदाराने विक्री संविदेच्या खाती त्यांचे विनियोजन केले त्यावेळी—मग अन्य पक्षाची अनुमती अशा विनियोजनाच्या पूर्वी मिळालेली असो वा नंतर मिळालेली असो—

तो माल राज्यामध्येच असेल तर, मालाची विक्री किंवा खरेदी ही राज्याच्या आतच घडल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—जेव्हा एकापेक्षा अधिक ठिकाणी असलेल्या मालाच्या विक्रीची किंवा खरेदीची संविदा एकच असेल तेव्हा, या पोटकलमाचे उपबंध जणू काही अशांपैकी प्रत्येक ठिकाणच्या मालाच्या बाबतीत वेगवेगळ्या संविदा असाव्यात त्याप्रमाणे लागू होतील.

---

१. १९६९ चा अधिनियम २८-कलम २ द्वारे "आणि विहित रीतीने ठरवलेल्या" याऐवजी घातले (भूतलक्षी प्रभावाने).

**मालाची विक्री किंवा खरेदी आयातीच्या किंवा निर्यातीच्या ओघात होते असे केव्हा म्हणावयाचे.**

५.(१) जर मालाची विक्री किंवा खरेदी यामुळे भारताच्या राज्यक्षेत्राबाहेर मालाची निर्यात घडून आली अथवा मालाने भारताच्या सीमाशुल्क सरहद्दी ओलांडल्यानंतर मालाच्या हक्कलेखांच्या हस्तांतरणाद्वारे ती विक्री किंवा खरेदी घडवून आणली गेली तरच फक्त ती विक्री किंवा खरेदी अशा निर्यातीच्या ओघात घडल्याचे मानण्यात येईल.

(२) जर मालाची विक्री किंवा खरेदी यामुळे भारताच्या राज्यक्षेत्रात मालाची आयात घडून आली अथवा मालाने भारताच्या सीमाशुल्क सरहद्दी ओलांडण्यापूर्वी मालाच्या हक्कलेखांच्या हस्तांतरणाद्वारे ती विक्री किंवा खरेदी घडवून आणली गेली तरच फक्त ती विक्री किंवा खरेदी अशा आयातीच्या ओघात घडल्याचे मानण्यात येईल.

[६][(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या विक्रीमुळे किंवा खरेदीमुळे कोणत्याही मालाची भारताच्या राज्यक्षेत्रातून निर्यात झाली तिच्या लगतपूर्वीची विक्री किंवा खरेदी जर अशा निर्यातीसाठी किंवा तत्संबंधी केलेल्या करारानंतर किंवा आलेल्या मागणीनंतर व त्यांच्या पूर्तीसाठी करण्यात आली असेल तर, अशी लगतपूर्व विक्री किंवा खरेदी हीसुद्धा अशा निर्यातीच्या ओघात घडून आली असे मानले जाईल.]

## प्रकरण ३ रे

### आंतरराज्यीय विक्रीकर

**आंतरराज्यीय विक्री-व्यवहारांवरील कर भरण्याचे दायित्व.**

६. [१][(१)] या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे केंद्र शासन अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या अगोदरचा नाही असा जो दिनांक नियत करील अशा दिनांकी[२] व तेव्हापासून प्रत्येक व्यापारी, याप्रमाणे अधिसूचित केलेल्या दिनांकी व तेव्हापासून कोणत्याही वर्षात आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात त्याने [३][विद्युत शक्ती सोडून अन्य मालाचे] जे विक्रीव्यवहार केले असतील त्या सर्व विक्रीव्यवहारांवर या अधिनियमाखाली कर भरण्यास दायी असेल :

[७][परंतु, मालाचा जो विक्रीव्यवहार कलम ५, पोटकलम (३) च्या उपबंधांनुसार, माल भारताच्या बाहेर निर्यात होण्याच्या ओघात झालेला विक्रीव्यवहार आहे अशा कोणत्याही विक्रीव्यवहारावर या अधिनियमाखाली कर भरण्यास व्यापारी दायी असणार नाही.]

[५][(१क) आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात एखाद्या व्यापाऱ्याने केलेली कोणत्याही मालाची विक्री त्या त्या राज्याच्या आत घडली असती तर त्या समुचित राज्याच्या विक्रीकर कायद्याखाली (विक्रेत्यावर वा खरेदीदारावर) कोणताही कर बसला नसता असे असले तरीही, तो व्यापारी त्या विक्रीवर या अधिनियमाखाली कर भरण्यास दायी होईल.]

[४][(२) पोटकलम (१) किंवा पोटकलम (१क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात कोणत्याही मालाची विक्री झाल्यामुळे अशा मालाची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात ने-आण घडली असेल किंवा ती विक्री अशा मालाची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात ने-आण करताना त्या मालाच्या हक्कलेखांच्या हस्तांतरणाद्वारे घडवली गेली असेल तेव्हा—

(क) शासनाला, किंवा

(ख) माल हा कलम ८, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या वर्णनाचा असल्यास, शासन सोडून अन्य नोंदलेल्या व्यापाऱ्याला,

अशा मालाच्या हक्कलेखांच्या हस्तांतरणाद्वारे अशा ने-आणीच्या दरम्यान केलेली त्यानंतरची कोणतीही विक्री या अधिनियमाखालील करापासून मुक्त असेल :

परंतु, विक्री घडवणाऱ्या व्यापाऱ्याने,—

(क्) विहित प्रधिकाऱ्याकडून मिळविलेले, विहित नमुन्यात विहित तपशील अंतर्भूत असलेले व ज्याच्याकडून माल खरेदी केला त्या नोंदलेल्या व्यापाऱ्याने रीतसर भरून स्वाक्षरित केलेले प्रमाणपत्र, आणि—

(ख्) जर नंतरची विक्री—

(एक) नोंदलेल्या व्यापाऱ्याला केलेली असेल तर, कलम ८-पोटकलम (४)-खंड (क्) मध्ये निर्देशिलेले अधिकथन, किंवा

(दोन) नोंदलेला व्यापारी म्हणून नसलेल्या शासनाला केली असेल तर, कलम ८-पोटकलम (४)-खंड (ख्) मध्ये निर्देशित केलेले प्रमाणपत्र,

---

१. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ३ द्वारे मूळ कलम ६ याला त्याचे पोटकलम '(१)' म्हणून नवीन क्रमांक दिला व पोटकलम (२) जादा दाखल केले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १ जुलै १९५७—पहा, अधिसूचना क्र. एस्.आरओ. ९४०-ए, दिनांक २६ मार्च १९५७, **भारताचे राजपत्र** असाधारण, १९५७, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १२३३/१.

३. १९७२ चा अधिनियम ६१-कलम २ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

४. **कित्ता—** कलम २ द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

५. १९६९ चा अधिनियम २८-कलम ३ द्वारे घातले (भूतलक्षी प्रभावाने).

६. १९७६ चा अधिनियम १०३-कलम ३ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

७. **कित्ता—** कलम ४ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

विहित प्राधिकाऱ्याकडे विहित रीतीने आणि विहित कालावधीच्या आत किंवा तो प्राधिकारी पुरेशा कारणास्तव मंजूर करील अशा आणखी कालावधीच्या आत सादर केल्याशिवाय अशी नंतरची कोणतीही विक्री या पोटकलमाखालील करापासून मुक्त होणार नाही :

परंतु आणखी असे की, जर––

(क्) मालाची नंतरची विक्री किंवा खरेदी समुचित राज्याच्या विक्रीकर कायद्याखाली सर्वसाधारणपणे करमुक्त असेल किंवा तीन टक्क्यांहून कमी दराने सर्वसाधारणपणे करास (मग तो कर म्हणून किंवा फी म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधलेला असो) पात्र असेल ; आणि

(ख्) अशी नंतरची विक्री घडवणाऱ्या व्यापाऱ्याने अशी विक्री ही या पोटकलमाच्या खंड (क्) किंवा खंड (ख्) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाची आहे असे मागील परंतुकात निर्देशिलेल्या प्राधिकाऱ्याची खात्री पटेल अशा प्रकारे शाबीत केले तर––

त्या माल-विक्रीबाबत मागील परंतुकाच्या खंड (ख्) मध्ये निर्देशिलेले अधिकथन किंवा प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता असणार नाही.]

[१][विक्रीद्वारे नव्हे तर अन्यथा मालाचे हस्तांतरण घडले असा दावा केल्यास त्या बाबतीत शाबितीचा भार, इ.]

[१][६क. (१) जेव्हा कोणताही व्यापारी आपल्या धंद्याच्या अन्य कोणत्याही ठिकाणी अथवा, प्रकरण-परत्वे, आपल्या एजंटाकडे किंवा प्रकर्त्याकडे माल पाठवायचा असल्यामुळे अशा मालाची एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये ने-आण घडली आणि ती विक्रीमुळे झाली नाही या कारणावरून अशा मालाच्या संबंधात या अधिनियमाखाली कोणताही कर भरण्यास आपण दायी नाही असा दावा करील तेव्हा, त्या मालाची ने-आण त्या तऱ्हेने घडली हे शाबीत करण्याचा भार त्या व्यापाऱ्यावर राहील आणि या प्रयोजनार्थ त्याला असा माल रवाना केल्याचा पुरावा देऊन सोबत विहित प्राधिकरणाकडून मिळालेले विहित नमुन्यात विहित तपशील अंतर्भूत असलेले धंद्याच्या अन्य ठिकाणी असलेल्या प्रधान पदाधिकाऱ्याने अथवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या एजंटाने किंवा प्रकर्त्याने रीतसर भरून स्वाक्षरित केलेले अधिकथन निर्धारक प्राधिकाऱ्याकडे विहित कालावधीच्या आत किंवा तो प्राधिकारी पुरेशा कारणास्तव मंजूर करील अशा आणखी कालावधीच्या आत सादर करता येईल.

(२) आपणांस आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर निर्धारक प्राधिकाऱ्याची अशी खात्री झाली की, पोटकलम (१) खाली व्यापाऱ्याने सादर केलेल्या अधिकथनामध्ये अंतर्भूत असलेला तपशील खरा आहे, तर या अधिनियमाखाली व्यापाऱ्याकडून प्रदेय असणाऱ्या कराचे निर्धारण करतेवेळी अथवा त्यापूर्वी केव्हाही तो प्राधिकारी तशा अर्थाचा आदेश काढू शकेल आणि तदनंतर, ज्याच्याशी ते अधिकथन संबंधित आहे त्या मालाची ने-आण विक्रीचा परिणाम म्हणून नव्हे तर अन्यथा घडली असे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**––या कलमामध्ये "निर्धारक प्राधिकारी" याचा व्यापाऱ्याच्या संबंधातील अर्थ, या अधिनियमाखाली व्यापाऱ्याकडून प्रदेय असणारा कर निर्धारित करण्यास त्या त्या काळी सक्षम असणारा प्राधिकारी असा आहे.]

**व्यापाऱ्यांची नोंदणी.**

७. (१) या अधिनियमाखाली कर भरण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यापाऱ्याला या अधिनियमाखाली नोंदणी करण्यासाठी समुचित राज्यातील जो प्राधिकारी केंद्र शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याकडे त्या प्रयोजनार्थ विहित असेल अशा कालावधीच्या आत अर्ज करावा लागेल, आणि अशा प्रत्येक अर्जामध्ये विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असेल.

[३][(२) समुचित राज्याच्या विक्रीकर कायद्याखाली कर देण्यास दायी असलेल्या प्रत्येक व्यापाऱ्याला अथवा जेव्हा समुचित राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये असा कोणताही कायदा अंमलात नसेल तेव्हा त्या राज्यात किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या भागामध्ये धंद्याची जागा असणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला, तो या अधिनियमाखाली कर देण्यास दायी नसला तरीही, या अधिनियमाखाली नोंदणीसाठी पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि विहित करण्यात येईल असा तपशील अशा प्रत्येक अर्जामध्ये अंतर्भूत असेल.

**स्पष्टीकरण.**––व्यापाऱ्याने केलेल्या विक्रीला किंवा खरेदीला समुचित शासनाच्या विक्रीकर कायद्याखाली करातून सूट असली किंवा तिच्या बाबतीत कराचा परतावा किंवा वटाव अनुज्ञेय असला तरीही, या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ तो व्यापारी अशा कायद्याखाली कर भरण्यास दायी असल्याचे मानण्यात येईल.]

[१][(२क) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली ज्याच्याकडे अर्ज करण्यात आला आहे त्या प्राधिकाऱ्याला जर, या अधिनियमाखाली प्रदेय असलेला कर योग्यप्रकारे वसूल होण्यासाठी अथवा कलम ६-पोटकलम (२)-पहिले परंतुक-खंड (क्) अगर कलम ६क-पोटकलम (१) अगर कलम ८-पोटकलम[२](४)-खंड (क्) यांमध्ये निर्दिष्ट केलेली प्रपत्रे योग्य प्रकारे सांभाळून ठेवण्यासाठी व वापरण्यासाठी तसे करणे जरूरीचे आहे असे वाटले तर, तो लेखी आदेशाद्वारे आणि त्यात कारणे नमूद करून,

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ३ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता––कलम ४ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

३. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ४ द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

नोंदणी प्रमाणपत्र देण्याबद्दलची शर्त म्हणून असे आवश्यक करू शकेल की, पूर्वोक्त अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी व्यापाऱ्याने विहित रीतीने आणि आदेशात विनिर्दिष्ट केली असेल अशा मुदतीत याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात आली असेल अशी प्रतिभूती सादर करावी.]

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली ज्या प्राधिकाऱ्याकडे अर्ज केलेला आहे त्याची जर अशी खात्री पटली की, तो अर्ज हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम [४][आणि पोटकलम (२क) खाली कोणतीही शर्त लादली असल्यास ती शर्त यांना धरून आहे], तर तो अर्जदाराची नोंदणी करील व त्याला विहित नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल आणि त्यामध्ये कलम ८-पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ मालाचा किंवा मालाचे वर्ग विनिर्दिष्ट करण्यात येतील.

[१][(३क) जेव्हा या कलमाखाली नोंदणी प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याला या अधिनियमाखाली प्रदेय असणाऱ्या कराची योग्य प्रकारे वसुली करण्यासाठी किंवा पोटकलम (२क) मध्ये निर्देशिलेली प्रपत्रे योग्य प्रकारे सांभाळून ठेवण्यासाठी व वापरण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे आढळून येईल तेव्हा तो, ज्या व्यापाऱ्याला प्रमाणपत्र दिलेले आहे त्याला, असे प्रमाणपत्र अंमलात असताना कोणत्याही वेळी लेखी आदेशाद्वारे आणि त्यामध्ये कारणे नमूद करून, पूर्वोक्त अशा सर्व किंवा त्यांपकी कोणत्याही प्रयोजनांसाठी आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी प्रतिभूती किंवा त्या व्यापाऱ्याने हे पोटकलम किंवा पोटकलम (२क) याखालील आदेशानुसार कोणतीही प्रतिभूती अगोदरच सादर केलेली असल्यास तशीच आणखी प्रतिभूती आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीमध्ये व विहित रीतीने सादर करण्यास फर्मावू शकेल.

[२][(३ख) कोणत्याही व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, पोटकलम (२क) खालील कोणतीही प्रतिभूती, पोटकलम (३क) खाली कोणतीही प्रतिभूती किंवा जादा प्रतिभूती सादर करण्यास त्याला फर्मावता येणार नाही.]

[३][(३खख) पोटकलम (२क) किंवा पोटकलम (३क) खाली व्यापाऱ्याने जी प्रतिभूती सादर करावी असे त्यातील निर्दिष्ट प्राधिकारी फर्मावील तिची रक्कम अथवा अशी प्रतिभूती आणि पोटकलम (३क) खाली त्याने जी जादा प्रतिभूती सादर करावी असे त्यात निर्दिष्ट केलेला प्राधिकारी फर्मावील ती मिळून होणारी एकवट रक्कम—

(क) पोटकलम (२) खाली ज्या व्यापाऱ्याने अर्ज केला असेल, किंवा ज्याची अर्जानुसार नोंदणी झालेली असेल त्याहून अन्य व्यापाऱ्याच्या बाबतीत, ज्या वर्षामध्ये अशी प्रतिभूती किंवा, प्रकरण-परत्वे, जादा प्रतिभूती सादर करणे आवश्यक केलेले आहे त्या वर्षामधील अशा व्यापाऱ्याच्या उलाढालीवर अशा प्राधिकाऱ्याच्या अंदाजानुसार या अधिनियमाखाली प्रदेय असणाऱ्या कराच्या रकमेपेक्षा ; आणि

(ख) पोटकलम (२) खाली ज्या व्यापाऱ्याने अर्ज केला असेल, किंवा अर्जानुसार ज्याची नोंदणी झालेली असेल त्याच्या बाबतीत, अशा व्यापाऱ्याची या अधिनियमाखाली नोंदणी झाली नसती तर ज्या वर्षामध्ये अशी प्रतिभूती किंवा, प्रकरणपरत्वे, जादा प्रतिभूती सादर करणे आवश्यक केलेले आहे त्या वर्षातील आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात अशा व्यापाऱ्याला केलेल्या विक्रीच्या व्यवहारांवर अशा प्राधिकाऱ्याच्या अंदाजानुसार या अधिनियमाखाली बसण्याजोग्या असलेल्या कराच्या रकमेपेक्षा,

जास्त असणार नाही.]

(३ग) जर पोटकलम (२क) किंवा पोटकलम (३क) खाली व्यापाऱ्याने सादर केलेली प्रतिभूती ही जामीनखताच्या स्वरूपात असेल आणि तो जामीनदार दिवाळखोर बनला किंवा मृत्यू पावला तर, पूर्वोक्तांपैकी कोणतीही घटना घडल्यापासून तीस दिवसांच्या आत त्या व्यापाऱ्याला नोंदणी प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे ते वृत्त कळवावे लागेल व अशी घटना घडल्यापासून नव्वद दिवसांच्या आत नवीन जामीनखत सादर करावे लागेल किंवा विहित रीतीने त्या बंधपत्राच्या रकमेबद्दल अन्य प्रतिभूती सादर करावी लागेल.

(३घ) नोंदणी प्रमाणपत्र देणारा प्राधिकारी—

(क) व्यापाऱ्याकडून प्रदेय असलेल्या कराची किंवा दंडाची कोणतीही रक्कम वसूल करण्यासाठी;

(ख) पोटकलम (२क) मध्ये निर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही प्रपत्राचा व्यापाऱ्याने गैरवापर केलेला आहे किंवा ते योग्य प्रकारे सांभाळून ठेवण्यास तो चुकला आहे असे आढळून आल्यास,

त्या व्यापाऱ्याने सादर केलेली संपूर्ण प्रतिभूती किंवा तिचा कोणताही भाग आदेशाद्वारे आणि सबळ व पुरेशा कारणास्तव समपहृत करू शकेल :

परंतु, व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज या पोटकलमाखाली कोणताही आदेश काढला जाणार नाही.

(३ङ) जर एखाद्या व्यापाऱ्याने सादर केलेली प्रतिभूती पोटकलम (३घ) खाली काढलेल्या आदेशामुळे अपुरी झाली तर, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीमध्ये ती तूट त्याला भरून काढावी लागेल.

---

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ४ द्वारे खंड (३क) ते (३ञ) घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम १०३-कलम ५ द्वारे मूळ पोटकलम (३ख) ऐवजी घातले. (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ५ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ४ द्वारे घातलें (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेंव्हापासून).

(३च) पोटकलम (२क) मध्ये निर्दिष्ट केलेली प्रपत्रे देणारा प्राधिकारी हा, ज्याने ते पोटकलम किंवा पोटकलम (३क) याखालील आदेशाचे अथवा पोटकलम (३ग) किंवा पोटकलम (३ङ) याच्या उपबंधांचे पालन करण्यात कसूर केली असेल तो व्यापारी अशा आदेशाचे किंवा, प्रकरणपरत्वे, अशा उपबंधांचे पालन करीत नाही तोपर्यंत त्याला अशी प्रपत्रे देण्यास नकार देऊ शकेल.

(३छ) नोंदणी प्रमाणपत्र देणारा प्राधिकारी हा, ज्या व्यापाऱ्याला ते दिलेले आहे त्याच्या अर्जावरून या कलमाखाली प्रतिभूतीच्या रूपाने त्या व्यापाऱ्याने अनामत ठेवलेली कोणतीही रक्कम किंवा तिचा कोणताही भाग या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जर त्याची आवश्यकता नसेल तर परत करण्याचा आदेश देऊ शकेल.

(३ज) पोटकलम (२क), पोटकलम (३क), पोटकलम (३घ) किंवा पोटकलम (३छ) याखाली काढलेल्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अशा आदेशाविरुद्ध विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे (या कलमामध्ये यापुढे 'अपील प्राधिकरण' म्हणून निर्देशिलेले) तिच्यावर आदेश बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, पण प्रतिभूती सादर करून नंतर अपील दाखल करता येईल:

परंतु, पुरेशा कारणास्तव अपील प्राधिकरण—

(क) उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर; किंवा

(ख) अशी संपूर्ण प्रतिभूती किंवा तिचा कोणताही भाग सादर करण्यात आल्याशिवाय, अपील दाखल करण्याची परवानगी देऊ शकेल.

(३झ) पोटकलम (३ज) खालील कोणत्याही अपिलाची सुनावणी करताना अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा अपिलांच्या बाबतीत प्रदेय असणारी फी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल;

(३ञ) पोटकलम (३ज) खालील कोणत्याही अपिलामध्ये अपील प्राधिकरणाने दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल.]

[१][(४) या कलमाखाली दिलेले नोंदणी प्रमाणपत्र—

(क) ते देणाऱ्या प्राधिकाऱ्याची जर अशी खात्री पटली की, नोंदलेल्या व्यापाऱ्याला दिलेले नोंदणी प्रमाणपत्र हे त्याने आपल्या धंद्याचे नाव, जागा किंवा स्वरूप किंवा ज्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या मालाचा तो धंदा चालवतो ते बदलल्याच्या कारणास्तव किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव विशोधित करण्याची आवश्यकता आहे तर, ज्या व्यापाऱ्याला ते प्रमाणपत्र दिलेले आहे त्यांच्या अर्जावरून किंवा असा कोणताही अर्ज केलेला नसेल तेव्हा त्या व्यापाऱ्याला योग्य नोटीस देऊन त्या प्राधिकाऱ्याला ते विशोधित करता येईल; किंवा

(ख) जर व्यापाऱ्याने धंदा चालवण्याचे बंद केलेले आहे [२][ अथवा तो व्यापारी अस्तित्वात राहिलेला नाही अथवा पोटकलम (३क) खालील आदेशाचे किंवा पोटकलम (३ग) अगर पोटकलम (३ङ) यांच्या उपबंधांचे अनुपालन करण्यात त्याने पुरेशा कारणाशिवाय कसूर केली आहे अथवा या अधिनियमाखालील कोणताही कर किंवा दंड भरण्यास तो चुकला आहे ], अथवा पोटकलम (२) खाली नोंदणी केलेल्या व्यापाऱ्याच्या बाबतीत, तो समुचित राज्याच्या विक्रीकर कायद्याखाली कर देण्यास दायी राहिलेला नाही याबाबत ते प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याची, ज्याला ते प्रमाणपत्र दिले आहे त्या व्यापाऱ्याला योग्य ती नोटीस दिल्यानंतर खात्री पटली तर, किंवा अन्य कोणत्याही पुरेशा कारणास्तव त्या प्राधिकाऱ्याला रद्द करता येईल.]

(५) नोंदलेल्या व्यापाऱ्याला आपले नोंदणी प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे अशी नोंदणी रद्द करण्यासाठी वर्ष संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर विहित रीतीने अर्ज करता येईल, आणि तो व्यापारी या अधिनियमाखाली कर देण्यास दायी नसेल तर प्राधिकारी त्यानुसार नोंदणी रद्द करील, आणि जर त्याने तसे केले तर असे रद्द होणे हे त्या वर्षाच्या अखेरीपासून परिणामक होईल.

**आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात होणाऱ्या विक्री-व्यवहारांवरील कराचे दर.**

८. [३][(१) जो जो व्यापारी आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहाराच्या ओघात—

(क) शासनाला कोणताही माल विकेल; किंवा

(ख) शासनाखेरीज अन्य नोंदलेल्या व्यापाऱ्याला पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या वर्णनाचा माल विकेल,

---

१. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ४ द्वारें मूळ पोटकलम (४) एवजी घातल (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १९७२ चा अधिनियम ६१-कलम४ द्वारे "अथवा अस्तित्वात राहिलेला नाही" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

३. १९५८ चा अधिनियम ३१ कलम ५ द्वारे पोटकलमे (१) त (४) यांएवजी घातले (१ एप्रिल, रोजी १९७३ व तेव्हापासून).

तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमाखाली कर देण्यास दायी होईल व तो कर त्याच्या एकूण उलाढाली-च्या [1][चार टक्के] इतका असेल.

(२) कोणत्याही व्यापाऱ्याकडून त्याच्या उलाढालीवर प्रदेय असणारा कर हा, जेथवर ती उलाढाल किंवा तिचा कोणताही भाग पोटकलम (१) मध्ये न मोडणाऱ्या आंतरराज्यीय व्यापाराच्या किंवा वाणिज्यव्यवहाराच्या ओघातील मालाच्या विक्रीशी संबंधित असेल तेथवर,—

(क्) घोषित मालाच्या बाबतीत, अशा मालाच्या समुचित राज्यातील विक्रीला किंवा खरेदीला लागू असलेल्या दराने परिगणना करून ठरवला जाईल; आणि

(ख्) घोषित मालाहून अन्य मालाच्या बाबतीत, [2][दहा टक्के] दर अथवा अशा मालाच्या समुचित राज्यातील विक्रीला किंवा खरेदीला लागू असलेला दर यांपैकी जो जास्त असेल त्या दराने परिगणना करून ठरविला जाईल;

आणि अशी कोणतीही परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ असा कोणताही व्यापारी समुचित शासनाच्या विक्रीकर कायद्याखाली कर देण्यास दायी असलेला व्यापारी असल्याचे मानण्यात येईल—मग प्रत्यक्षात तो त्या कायद्याखाली याप्रमाणे दायी नसला तरी हरकत नाही.

[4][(२क) कलम ६ चे पोटकलम (१क) अथवा या कलमाचे पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या मालाच्या विक्रीला किंवा, प्रकरणपरत्वे, खरेदीला समुचित शासनाच्या विक्रीकर कायद्याखाली करातून सरसकट सूट मिळालेली आहे अगर तीन टक्क्यांहून कमी असलेल्या दराने सरसकट करास (मग त्यास कर म्हणून किंवा फी म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधले जावो) पात्र आहे अशा कोणत्याही मालाच्या विक्रीशी व्यापाऱ्याची उलाढाल किंवा तिचा कोणताही भाग जेथवर संबंधित असेल तेथवर, त्या उलाढालीवर या अधिनियमाखाली त्याच्याकडून प्रदेय असणारा कर शून्य असेल किंवा, प्रकरणपरत्वे, तो कमी दराने परिगणना करून ठरविला जाईल.

**स्पष्टीकरण.**—जर कोणत्याही मालाच्या विक्रीला किंवा खरेदीला समुचित शासनाच्या विक्रीकर कायद्याखाली फक्त विनिर्दिष्ट परिस्थितीतच किंवा विनिर्दिष्ट शर्तींखालीच सूट असेल अथवा अशा मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर विनिर्दिष्ट टप्प्यांवर किंवा त्या मालाच्या उलाढालीला अनुलक्षून नव्हे तर अन्यथा कर बसविलेला असेल तर त्या बाबतीत, अशा मालाच्या विक्रीला किंवा खरेदीला त्या कायद्याखाली करातून सरसकट सूट मिळाली असे या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येणार नाही.]

(३) पोटकलम (१) च्या खंड (ख्) मध्ये निर्देशित केलेला माल म्हणजे—

[3](क्) * * * * * *

(ख्) [3]*** विक्रीसाठी मालाची निर्मिती करताना किंवा त्यावर प्रक्रिया करताना अगर खाण कामामध्ये अगर वीज किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या शक्तीची निर्मिती किंवा वितरण या कामी वापर करण्याच्या उद्देशाने, पुन्हा विकावयाचा माल म्हणून अथवा केंद्र शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, माल खरेदी करणाऱ्या नोंदलेल्या व्यापाऱ्याच्या नोंदणी प्रमाणपत्रा-मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर्गाचा किंवा वर्गांचा माल होय;

(ग्) विकावयाचा माल बांधण्यासाठी वापरावयाची पात्रे किंवा सामग्री म्हणून माल खरेदी करणाऱ्या नोंदलेल्या व्यापाऱ्याच्या नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेली पात्रे किंवा अन्य सामग्री होय;

(घ्) [3] * * * खंड (ख्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वर्गाचा किंवा वर्गांचा माल बांधण्यासाठी अथवा खंड (ग्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेली कोणतीही पात्रे किंवा अन्य सामग्री बांधण्या-साठी वापरली जाणारी पात्रे किंवा अन्य सामग्री होय.

(४) माल विकणाऱ्या व्यापाऱ्याने—

(क्) ज्या नोंदलेल्या व्यापाऱ्याला माल विकला त्या व्यापाऱ्याने रीतसर भरून स्वाक्षरित केलेले व विहित प्राधिकाऱ्याकडून मिळविलेल्या विहित प्रपत्रात विहित तपशील अंतर्भूत केलेले अधिकथन; किंवा

(ख्) नोंदलेला व्यापारी नसलेल्या शासनाला माल विकला असेल तर, रीतसर प्राधिकृत केलेल्या शासकीय अधिकाऱ्याने रीतसर भरून स्वाक्षरित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र,

१. १९७५ चा अधिनियम २५-कलम ३० द्वारे "तीन टक्के" याऐवजी घातले (१ जुलै, १९७५ रोजी व तेव्हापासून).
२. १९६३ चा अधिनियम ८-कलम २ द्वारे "सात टक्के" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६३ रोजी व तेव्हापासून).
३. कित्ता—कलम २ द्वारे गाळले (१ एप्रिल, १९६३ रोजी व तेव्हापासून).
४. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ५ द्वारे मूळ पोटकलम (२क) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

विहित प्राधिकाऱ्याकडे विहित रीतीने सादर केल्याखेरीज आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघातील कोणत्याही विक्रीला पोटकलम (१) चे उपबंध लागू होणार नाहीत:]

[१][परंतु, खंड (क) मध्ये निर्देशिलेले अधिकथन विहित कालावधीमध्ये किंवा पुरेशा कारणास्तव तो प्राधिकारी मंजूर करील अशा वाढीव कालावधीच्या आत सादर करावयास हवे.]

[२][(५) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, सार्वजनिक हितासाठी तसे करणे आवश्यक आहे अशी जर राज्य शासनाची खात्री झाली तर, ते **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने असे निदेशित करू शकेल की,—

(क) ज्याच्या धंद्याची जागा त्या राज्यात असेल अशा कोणत्याही व्यापाऱ्याने अशा कोणत्याही धंद्याच्या जागेमधून अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मालाच्या किंवा अशा वर्गातील मालाची आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात जी विक्री केली असेल तिच्या संबंधात त्याच्या-कडून या अधिनियमाखालील कोणताही कर प्रदेय असणार नाही, अथवा अशा विक्रीव्यवहारांवरील कर हा पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांहून कमी असे जे दर अधिसूचनेमध्ये नमूद केले जातील त्या दरांनी परिगणना करून ठरविला जाईल;

(ख) ज्याच्या धंद्याची जागा त्या राज्यात असेल अशा कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा अधिसूचने-मध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही वर्गातील व्यापाऱ्यांनी आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात कोणत्याही व्यक्तीला किंवा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गातील व्यक्तींना माल विकल्याचे सर्व व्यवहार किंवा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गातील माल विकल्याचे व्यवहार यांच्या संबंधात या अधिनियमाखाली कोणताही कर प्रदेय असणार नाही अथवा अशा सर्व विक्रीव्यवहारांवरील कर हा, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्याहून कमी असे जे दर अधिसूचनेमध्ये नमूद केले जातील त्या दरांनी परिगणना करून ठरविला जाईल. ]

[३][उलाढाल निश्चित करणे.]

[३][८क. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, व्यापाऱ्याची उलाढाल निश्चित करताना, विक्रीच्या किंमतीच्या एकवट रकमेतून खालील बाबी वजा केल्या जातील, त्या अशा—

(क) पुढील सूत्र लागू करून आलेली रक्कम—

$$\frac{\text{कराचा दर} \times \text{विक्रीच्या किंमतीची एकवट}}{\text{१०० अधिक कराचा दर}}:$$

परंतु, जर या अधिनियमाच्या उपबंधांनुसार नोंदलेल्या व्यापाऱ्याने कर म्हणून उगराणी केलेली रक्कम विक्रीच्या किंमतीच्या एकवट रकमेतून अन्यथा वजा केलेली असेल तर, वरील सूत्राच्या आधारे कोणतीही वजात करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—जेव्हा व्यापाऱ्याची उलाढाल वेगवेगळ्या दरांनी करपात्र असेल तेव्हा, कराच्या वेगवेगळ्या दरांस पात्र असणाऱ्या उलाढालीच्या प्रत्येक भागास पूर्वोक्त सूत्र वेगवेगळे लागू करण्यात येईल.

(ख) माल खरेदी करणाऱ्या व्यक्तींनी—

(एक) १४ मे, १९६६ या दिवसापूर्वी व्यापाऱ्याला परत केलेल्या मालाच्या बाबतीत, मालाच्या सुपूर्दगीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीत;

(दोन) १४ मे १९६६ रोजी किंवा त्यानंतर परत केलेल्या मालाच्या बाबतीत, मालाच्या सुपूर्दगीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत,

याप्रमाणे परत केलेल्या सर्व मालाची विक्री-किंमत :

परंतु, माल परत केल्याचा आणि त्याच्या विक्रीची किंमत परत केल्याचा किंवा त्याच्या हिशेबात समायोजन केल्याचा समाधानकारक पुरावा या अधिनियमाखाली व्यापाऱ्याकडून प्रदेय असणारा कर निर्धारित करण्यास किंवा, प्रकरणपरत्वे, पुनर्निर्धारित करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकरणापुढे सादर करा-वयास हवा; आणि

(ग) बाजाराची चालू परिस्थिती, व्यापाराची सुविधा व उपभोक्त्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र शासन विहित करील अशा अन्य वजाती.

(२) पोटकलम (१) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ व्यापाऱ्याची उलाढाल निश्चित करताना, विक्री-किंमतींच्या एकवट रकमेतून कोणतीही वजात केली जाणार नाही.]

---

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ५ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ५ द्वारे पोटकलम (५) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

३. १९६९ चा अधिनियम २८-कलम ५ द्वारे घातले (भूतलक्षी प्रभावाने).

**कर बसवणे व त्याची उगराणी करणे आणि दंड.** [1][2][९. (१) कोणत्याही व्यापाऱ्याने आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार यांच्या ओघात केलेल्या मालाच्या विक्रीव्यवहारांवर–मग असे विक्रीव्यवहार कलम (३) च्या खंड (क्) मध्ये मोडणारे असोत किंवा खंड (ख्) मध्ये मोडणारे असोत–या अधिनियमाखाली त्यांच्याकडून प्रदेय असणारा कर ज्या राज्यातून मालाची वाहतूक सुरू झाली त्या राज्यात भारत सरकारकडून बसविला जाईल व याप्रमाणे बसविलेल्या कराची पोटकलम (१) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने ते सरकार उगराणी करील :

[3][परंतु, एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये मालाची ने-आण करताना जी विक्री त्याच मालाबाबतच्या पहिल्या विक्रीनंतर झालेली असून जी कलम ६-पोटकलम (२) खाली मोडणारीही नाही अशा विक्रीच्या बाबतीत,—

(क्) जेव्हा अशी नंतरची विक्री नोंदलेल्या व्यापाऱ्याने केलेली असेल तेव्हा, अशा मालाच्या खरेदीच्या संबंधात कलम ८-पोटकलम (४)-खंड (क्) च्या प्रयोजनार्थ विहित केलेले प्रपत्र त्या नोंदलेल्या व्यापाऱ्याने ज्या राज्यामधून मिळवले किंवा तो मिळवू शकला असता त्या राज्यामध्ये, आणि

(ख्) जेव्हा अशी नंतरची विक्री नोंदणी न झालेल्या व्यापाऱ्याने केलेली असेल तेव्हा, ज्या राज्यामधून अशी नंतरची विक्री केली गेली असेल त्या राज्यामध्ये,

कर बसवला जाईल व त्याची उगराणी केली जाईल.]

(२) या अधिनियमाचे उपबंध व त्यांखाली केलेले नियम यांच्या अधीनतेने, समुचित राज्याच्या सर्वसाधारण विक्रीकर कायद्याखाली कोणताही कर निर्धारित करणे, फेरनिर्धारित करणे, त्याची उगराणी करणे व त्याचा सक्तीने भरणा करून घेणे यासाठी त्या त्या काळी शक्ती प्रदान झालेले प्राधिकारी, भारत सरकारच्या वतीने, अशा व्यापाऱ्यांकडून प्रदेय असणाऱ्या दंडसुद्धा या अधिनियमाखाली व्यापाऱ्याकडून प्रदेय असलेला कर किंवा दंड हा जणू काही त्या राज्याच्या सर्वसाधारण विक्रीकर कायद्याखाली प्रदेय असणारा कर किंवा दंड असावा त्याप्रमाणे तो कर निर्धारित करतील. फेरनिर्धारित करतील, त्याची उगराणी करतील व सक्तीने त्याचा भरणा करून घेतील; आणि या प्रयोजनार्थ त्यांना, राज्याच्या सर्वसाधारण विक्रीकर कायद्याखाली स्वत:स असणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती वापरता येतील; आणि प्रतिवेदने, तात्पुरते निर्धारण, कराचा आगाऊ भरणा, कोणत्याही धंद्याच्या हस्तांतरितीची नोंदणी, धंदा चालवणाऱ्या व्यक्तीवरील कराचे दायित्व अशा धंद्याच्या हस्तांतरितीवर किंवा उत्तराधिकाऱ्यावर टाकणे, कोणत्याही पेढीचे विसर्जन झाल्यामुळे अशा पेढीचे किंवा हिंदू अविभक्त कुटुंबात वाटण्या झाल्यामुळे अशा कुटुंबाचे कर भरण्याच्या दायित्वाचे हस्तांतरण, त्रयस्थ पक्षाकडून कराची वसुली, अपिले, पुनरीक्षणे, पुर्नविलोकने, निर्देशने, परतावे, वटाव, दंड, [4][व्याजाची आकारणी किंवा भरणा,] गुन्हे आपसात मिटवणे व व्यापाऱ्याने सादर केलेले दस्तऐवज गोपनीय म्हणून हाताळणे याबाबतच्या उपबंधांनासुद्धा अशा कायद्याचे उपबंध तद्नुसार लागू होतील :

परंतु, जर कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या भागात कोणताही सर्वसाधारण विक्रीकर कायदा अंमलात नसेल तर, केंद्र शासनाला याबाबतीत नियम करून त्याद्वारे या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी आवश्यक पतो उपबंध करता येईल.

[4][(२क) प्रत्येक राज्याच्या सर्वसाधारण विक्रीकर कायद्यातील गुन्हे व दंड यासंबंधातील सर्व उपबंध हे (गुन्ह्याबद्दलच्या खटल्याऐवजी करावयाचे अथवा गुन्ह्याबद्दलचे दंड किंवा शिक्षा यांशिवाय आणखी करावयाचे दंड याच्या संबंधातील उपबंध धरून, पण कलम १० व १० क मध्ये उपबंधित केलेल्या बाबींच्या संबंधातील उपबंध वगळून), अशा राज्यामध्ये या अधिनियमाखाली उगराणी करणे आवश्यक असलेला कोणताही कर हा जणू काही विक्रीकर कायद्याखालील कर असावा त्याप्रमाणे त्याचे निर्धारण, फेरनिर्धारण, उगराणी व त्याची सक्तीची वसुली या संबंधात अथवा असे निर्धारण, फेरनिर्धारण, उगराणी किंवा त्याची सक्तीची वसुली याच्याशी निगडित असलेल्या कोणत्याही प्रक्रियेच्या संबंधात आवश्यक त्या अपरिवर्तनांसह लागू होतील.]

(३) भारत सरकारच्या वतीने (संघ राज्यक्षेत्राहून अन्य) कोणत्याही राज्यामध्ये या अधिनियमाखाली बसवलेल्या व उगराणी केलेल्या कोणत्याही दंडातसुद्धा कोणत्याही कराचे कोणत्याही वित्तीय वर्षातील उत्पन्न त्या राज्याकडे अभिहस्तांकित केले जाईल व ते राज्य ते ठेवून घेईल; आणि संघ राज्यक्षेत्रांशी संबंधित असणारे उत्पन्न भारताच्या एकत्रित निधीचा भाग बनेल.]

**कराची उगराणी फक्त नोंदलेल्या व्यापाऱ्यांनीच करावयाची.** ९क. जी व्यक्ती नोंदलेला व्यापारी नाही अशा कोणत्याही व्यक्तीला आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात तिने केलेल्या कोणत्याही मालविक्रीच्या बाबतीत, या अधिनियमाखाली कराच्या रूपाने कोणत्याही रकमेची उगराणी करता येणार नाही, आणि कोणत्याही नोंदलेल्या व्यापाऱ्याला हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांना सोडून अन्यथा अशी कोणतीही उगराणी करता येणार नाही.]

---

१. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ६ द्वारे मूळ कलम ९ ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १९६९ चा अधिनियम २८-कलम ६ द्वारे कलम ९ ऐवजी घातले (भूतलक्षी प्रभावाने).

३. १९७६ चा अधिनियम १०३-कलम ६ द्वारे मूळ परंतुकाऐवजी घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. किता—कलम ६ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१][९ख. या अधिनियमाच्या उपबंधांखाली प्रदेय असणारी कराची, व्याजाची, दंडाची, द्रव्यदंडाची रक्कम किंवा अन्य कोणतीही रक्कम आणि त्याखाली देय असलेल्या परताव्याची रक्कम निकटतम रुपयात पूर्णांकित केली जाईल व या प्रयोजनार्थ, जेव्हा अशा रकमेमध्ये पैसे या रूपात असणारा रुपयाचा भाग असेल तेव्हा, जर तो भाग पन्नास किंवा त्याहून अधिक पैसे इतका असेल तर तो एक रुपयापर्यंत वाढवला जाईल आणि जर असा भाग पन्नास पैशांहून कमी असेल तर तो हिशबात धरला जाणार नाही : कर इ., पूर्णांकित करणे.

परंतु, आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात एखाद्या व्यापाऱ्याने केलेल्या कोणत्याही मालविक्रीच्या संबंधात त्याने या अधिनियमाखालील कराच्या रूपाने कोणत्याही रकमेची उगराणी करण्याच्या प्रयोजनार्थ या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

१०. जर कोणतीही व्यक्ती,— दंड.

[२][(क) जे खोटे असल्याचे स्वतःला माहीत आहे किंवा तसे समजण्यास स्वतःला कारण आहे असे प्रमाणपत्र किंवा अधिकथन कलम ६-पोटकलम (२) किंवा कलम ६क-पोटकलम (१) किंवा कलम ८-पोटकलम (४) याखाली सादर करील तर; किंवा

(कक) कलम ७ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे स्वतःची नोंदणी करवून घेण्यास चुकेल, अथवा त्या कलमाच्या पोटकलम (३क) खालील आदेशाचे अगर त्यातील पोटकलम (३ग) किंवा पोटकलम (३ङ) च्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यास चुकेल तर; किंवा]

(ख) नोंदलेला व्यापारी असून, एखाद्या वर्गाच्या मालाची खरेदी करताना अशा वर्गाचा माल आपल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या कक्षेत आहे असे खोटे अभिवेदन करील तर ; किंवा

(ग) नोंदलेला व्यापारी नसून, आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात मालाची खरेदी करताना आपण नोंदलेला व्यापारी आहोत असे खोटे अभिवेदन करील तर ; किंवा

(घ) कलम ८-पोटकलम (३)-[३][खंड (ख) किंवा खंड (ग) किंवा खंड (घ)] यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी कोणताही माल खरेदी केल्यानंतर, अशा कोणत्याही प्रयोजनासाठी त्या मालाचा वापर करण्यास कोणत्याही वाजवी सबबीशिवाय चुकेल तर ;

(ङ) कलम ८ पोटकलम (४) च्या प्रयोजनार्थ विहित केलेले कोणतेही प्रपत्र स्वतःजवळ बाळगत असून तिने किंवा तिच्या प्रकर्त्याने किंवा तिच्या एजंटाने हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम यांच्या उपबंधांनुसार ते मिळवलेले नसेल तर ;

[४][(च) कलम ९ क मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून कराच्या रूपाने कोणत्याही रकमेची उगराणी करील तर,]

ती सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल; आणि जेव्हा हा गुन्हा चालू राहणारा गुन्हा असेल तेव्हा, गुन्हा चालू असेल त्या प्रत्येक दिवसामागे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दैनंदिन द्रव्यदंडास पात्र होईल.

[५][१०क. [६][(१)] जर माल खरेदी करणारी कोणतीही व्यक्ती कलम १० च्या खंड (ख) किंवा खंड (ग) किंवा खंड (घ) खालील गुन्ह्याबद्दल दोषी असेल तर, या अधिनियमाखाली ज्याने तिला नोंदणी प्रमाणपत्र दिले तो प्राधिकारी किंवा ते देण्यास सक्षम असणारा प्राधिकारी, तिला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन नंतर, [३][जर त्या व्यक्तीला करण्यात आलेली मालविक्री ही पोटकलम (२) मध्ये मोडणारी विक्री असेल तर, त्या पोटकलमाखाली त्या विक्रीबाबत जो कर बसवला गेला असता त्याच्या] दीडपटीपेक्षा जास्त नसेल इतक्या रकमेचा दंड लेखी आदेशाद्वारे तिच्यावर बसवू शकेल : [५][खटल्याऐवजी दंड बसवणे.]

परंतु, कलम १० खालील गुन्ह्याबद्दल ज्या तथ्यांच्या बाबतीत या कलमाखाली दंड बसवला गेलेला आहे त्याच तथ्यांबाबत कोणताही खटला सुरू करता येणार नाही.

---

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ७ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

४. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ७ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ८ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

६. १९६९ चा अधिनियम २८-कलम ७ द्वारे कलम १०क ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

[१][(२) पोटकलम (१) खाली कोणत्याही व्यापाऱ्यावर बसवलेल्या दंडाची उगराणी —

(क्) कलम १०-खंड (ख्) किंवा खंड (घ्) खाली मोडणाऱ्या गुन्ह्याच्या बाबतीत, माल खरेदी करणाऱ्या व्यक्तीने अशा मालाच्या खरेदीच्या संबंधात कलम ८-पोटकलम (४)-खंड (क्) च्या प्रयोजनार्थ विहित केलेले प्रपत्र ज्या राज्यात मिळवले त्या राज्यात;

(ख्) कलम १०-खंड (ग्) खाली मोडणाऱ्या गुन्ह्याच्या बाबतीत, गुन्हा घडला नसता तर माल खरेदी करणाऱ्या व्यक्तीला ज्या राज्यात स्वतःची नोंदणी करावी लागली असती त्या राज्यात

भारत सरकार कलम ९-पोटकलम (२) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने करील.]

गुन्ह्यांची दखल घेणे.

**११.** (१) कोणतेही न्यायालय हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही गुन्ह्याबाबत, ज्या शासनाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये हा गुन्हा घडला असेल त्याच्या अथवा ते शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्या शासनाचा जो अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीखेरीज दखल घेणार नाही, आणि इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय अशा कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.

(२) या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणारे सर्व गुन्हे दखलपात्र व जामीनयोग्य असतील.

दायित्वनिराकरण.

**१२.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांखाली सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

**१३.** (१) केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील बाबींविषयी उपबंध करणारे नियम करता येतील, त्या बाबी अशा :—

(क्) या अधिनियमाखालील नोंदणीसाठी कोणत्या रीतीने अर्ज करता येतील ती रीत, त्यांमध्ये अंतर्भूत करावयाचा तपशील, अशी नोंदणी मंजूर करण्याची कार्यपद्धती, कोणत्या परिस्थितीत नोंदणी नाकारता येईल ती परिस्थिती आणि कोणत्या नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देता येईल तो नमुना ;

(ख्) उलाढालीचा कालावधी, या अधिनियमाखालील कोणत्याही मालविक्रीच्या संबंधातील उलाढाल कोणत्या रीतीने निश्चित करण्यात येईल, आणि ते निश्चित करण्याची प्रक्रिया चालू असता, [४][कलम ८क-पोटकलम (१)-खंड (ग्) याखाली] कोणत्या वजाती करता येतील;

(ग्) या अधिनियमाखाली मंजूर केलेली कोणतीही नोंदणी कोणत्या बाबतीत व कोणत्या परिस्थितीत व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने रद्द करता येईल;

[३][(घ्) या अधिनियमाखालील कोणतेही अधिकथन किंवा प्रमाणपत्र कोणत्या प्रपत्रात द्यावयाचे आणि त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील, [४][असे प्रपत्र किंवा अधिकथन मुळात जेथे दिले ते राज्य आणि असे प्रमाणपत्र किंवा अधिकथन किती अवधीत हजर किंवा सादर करावयाचे तो अवधी] ;

(ङ्) विक्रीसाठी मालाची निर्मिती करताना किंवा मालावर प्रक्रिया करताना अथवा खाणकामामध्ये अथवा वीज किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या शक्तीच्या निर्मितीमध्ये किंवा वितरणामध्ये वापरलेल्या मालाची किंवा मालवर्गाची प्रगणना;

(च्) कोणत्या बाबींच्या संबंधात कलम ९-[२][पोटकलम (२)] च्या परंतुकाखाली उपबंध करता येईल;

(छ्) या अधिनियमाखालील अर्जांच्या संबंधात प्रदेय असणारी फी.]

[५][(२) पोटकलम (१) खाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीमध्ये सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे

---

१. १९६९ चा अधिनियम २८-कलम ७ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता—कलम ८ द्वारे "पोटकलम (३)" याऐवजी घातले (भूतलक्षी प्रभावाने).
३. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ९ द्वारे खंड (घ्) ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).
४. १९७२ चा अधिनियम ६१-कलम १० द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).
५. कित्ता—कलम १० द्वारे पोटकलम (२) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

(३) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला, या अधिनियमाचे उपबंध व पोटकलम (१) खाली केलेले नियम यांच्याशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

(४) विशेषत: आणि पोटकलम (३) खाली प्रदान केलेल्या शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, राज्य शासनाला पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी नियम करता येतील, ती प्रयोजने अशी :—

(क्) नोंदलेल्या व्यापाऱ्यांच्या सूच्या, अशा सूच्यांमध्ये वेळोवेळी केलेली विशोधने व अशा सूच्यांमध्ये अंतर्भूत असावयाचा तपशील प्रकाशित करणे ;

[१][ (क्क्) कलम ७ च्या पोटकलम (२क) किंवा पोटकलम (३क) किंवा पोटकलम (३ग) खाली कोणत्या रीतीने प्रतिभूती सादर करता येईल आणि त्या कलमाच्या पोटकलम (३ङ) खाली कोणतीही तूट कोणत्या रीतीने व किती कालावधीत भरून काढता येईल; ]

(ख्) नोंदलेल्या व्यापाऱ्यांनी आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघातील विक्रीव्यवहारांसंबंधीचे हिशेब कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने ठेवावयाचे ;

(ग्) कोणत्याही व्यापाऱ्याचे मालाचे साठे व त्याने केलेले मालाच्या खरेदीचे, विक्रीचे व सुपूर्दगीचे व्यवहार यांसंबंधीची कोणतीही माहिती किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याच्या धंद्याशी संबंधित अन्य कोणतीही माहिती पुरवण ;

(घ्) या अधिनियमाखाली जी कोणतीही पुस्तके, हिशेब किंवा दस्तऐवज ठेवणे आवश्यक आहे त्यांचे निरीक्षण करणे, अशी कोणतीही पुस्तके, हिशेब किंवा दस्तऐवज जेथे ठेवलेले असतील किंवा ठेवलेले असावेत असा संशय आहे अशा कोणत्याही वास्तूमध्ये अशी पुस्तके, हिशेब किंवा दस्तऐवज यांचा शोध घेऊन ते सक्तीने ताब्यात घेण्यासाठी प्रवेश करणे ;

[२][ (ङ्.) कलम ६-पोटकलम (२) च्या पहिल्या परंतुकाच्या खंड (क्) खाली विहित केलेल्या प्रमाणपत्राचे अथवा कलम ६क-पोटकलम (१) किंवा कलम ८-पोटकलम (४) याखाली विहित केलेल्या अधिकथनाचे कोणतेही प्रपत्र कोणत्या प्राधिकाऱ्याकडून कोणत्या शर्तींच्या अधीनतेने आणि किती फी भरून मिळवता यईल, अशी प्रपत्रे कोणत्या रीतीने अभिरक्षेत ठेवली जातील व त्यासंबंधीचे कागदपत्र कोणत्या रीतीने ठेवले जातील आणि कोणत्या रीतीने असे कोणतेही प्रपत्र वापरता येईल व असे कोणतेही प्रमाणपत्र किंवा अधिकथन सादर करता येईल ;

(ङ्.ङ्.) कलम ७-पोटकलम (३ज) खाली कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने आणि कोणत्या प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल, अशा अपिलांच्या सुनावणीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशा अपिलांबाबत द्यावयाची फी ; ]

(च्) अविभक्त हिंदू कुटुंब, अधिसंघ, क्लब, संस्था, पेढी किंवा कंपनी यांच्या बाबतीत अथवा जी व्यक्ती पालक किंवा विश्वस्त म्हणून किंवा अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने धंदा चालवते तिच्या बाबतीत, त्या राज्यामध्ये व्यापाऱ्यांच्या धंद्याच्या संबंधात जी व्यक्ती व्यवस्थापक म्हणून मानण्यात येईल तिचे नाव नमूद करणारे अधिकथन सादर करणे व कोणत्या नमुन्यात असे अधिकथन देता येईल तो नमुना ;

(छ्) कोणत्याही धंद्याच्या मालकीतील अथवा कोणत्याही व्यापाऱ्याने चालवलेल्या कोणत्याही धंद्याचे [३][नाव, जागा किंवा स्वरूप] यामधील बदल किती कालावधीत, कशा रीतीने व [३][कोणत्या प्राधिकरणांकडे] सादर करावा लागेल.

(५) या कलमाखाली कोणताही नियम करताना [३][केंद्र शासन किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन] असा निदेश देऊ शकेल की, त्या नियमाचा भंग हा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल व जेव्हा हा गुन्हा चालू राहणारा गुन्हा असेल तेव्हा, गुन्हा चालू असेल त्या प्रत्येक दिवसामागे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दैनंदिन द्रव्यदंडास पात्र असेल.

---

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम १० द्वारे घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

३. १९५८ चा अधिनियम ३१-कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण ४ थे

## आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांमधील विशेष महत्त्वाचा माल

विवक्षित माल आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांमध्येविशेष महत्त्वाचा असणे.

**१४.** याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पुढील माल हा आंतरराज्यीय व्यापारात किंवा वाणिज्यव्यवहारात विशेष महत्त्वाचा असेल :—

[१][(एक) तृणधान्ये, म्हणजे—

(एक) भात/धान/साळ (Oryza sativa L.) ;

(दोन) तांदूळ (Oryza sativa L.) ;

(तीन) गहू (Triticum vulgare, T. compactum, T. sphaerococcum, T. durum, T. aestivum L., T. dicoccum);

(चार) ज्वारी किंवा मिलो (Sorghum vulgare Pers) ;

(पाच) बाजरी (Pennisetum typhoideum L.) ;

(सहा) मका (Zea mays D.) ;

(सात) रागी (Eleusine coracana Gaertn.) ;

(आठ) कोदो (Paspalum scrobiculatum L.) ;

(नऊ) कुटकी (Panicum miliare L.) ;

(दहा) बार्ली (Hordeum vulgare L.) ; ]

[३][[१][(एक-क्)] कोळसा—सर्व रूपातील कोक धरून, पण लाकडी कोळसा वगळून :

परंतु, २३ फेब्रुवारी, १९६७ रोजी सुरू होणाऱ्या व 'केंद्रीय विक्रीकर (विशोधन) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ६१) याच्या कलम ११ च्या प्रारंभ-दिनांकी संपणाऱ्या कालावधीत "पण लाकडी कोळसा वगळून" हे शब्द गाळून तेवढ्या फरकानिशी हा खंड परिणामक होईल ; ]

(दोन) कापूस म्हणजे कच्च्या अवस्थेतील (देशी किंवा आयातीचा) सर्व प्रकारचा कापूस—मग तो सरकी काढलेला असो वा नसो, गाठी बांधलेला असो, दाबलेला असो वा अन्य अवस्थेतील असो,—पण त्यामध्ये कापसातील गदळ समाविष्ट नाही ;

[४][(दोन-क्) 'केंद्रीय उत्पादन शुल्क व मीठ अधिनियम, १९४४' (१९४४ चा १) याच्या पहिल्या अनुसूचीतील बाब क्र. [५][१९] मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सुती कापड ;

(दोन-ख्) कापसाचे सूत, पण कापसाच्या सुतातील गदळ समाविष्ट नाही; ]

[२][(दोन-ग्) अशोधित तेल म्हणजे (जंबशिला, चुनखडीचा दगड, रेती अशासारख्या) बिटुमिनी खनिजांपासून पैदा केलेली अशोधित पेट्रोलिअम तेले व अशोधित तेले—मग त्यांची घटना कशीही असो, नैसर्गिक किंवा द्रवीभूत तेलसाठ्यांपासून मिळालेली असो किंवा बिटुमिनी खनिजांचे विघटन-कारी ऊर्ध्वपातन करून मिळालेली असो आणि त्यांच्यावर पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रक्रिया केलेल्या असोत वा नसोत :—

(१) निवळणे ;

(२) क्षारहीन करणे ;

(३) निर्जलीकरण ;

(४) बाष्पाचा दाब सामान्य पातळीवर आणण्यासाठी स्थिरीकरण ;

(५) अति हलके घटकांश अशा उद्देशाने मुक्त करणे की, तेलसाठ्यांमधील प्रवाहित्व वाढवण्या-साठी व दाब स्थिर राखण्यासाठी ते पुन्हा त्यात घालता यावेत ;

(६) उपरोक्त प्रक्रियांच्या ओघात पूर्वी भौतिक पद्धतींनी मिळवलेले तेवढेच हायड्रोकार्बन्स अधिक घालणे ;

(७) ज्यामुळे द्रव्याचा अंगभूत गुणधर्म बदलत नाही अशी अन्य कोणतीही प्रक्रिया (ओतबिंदू कमी करणारी किंवा प्रवाहित्व वाढवणारी द्रव्ये घालण्याची प्रक्रियासुद्धा) ; ]

---

१. १९७६ चा अधिनियम १०३-कलम ७ द्वारे मूळ खंड (१) ला '(१क)' असा नवीन क्रमांक दिला व त्याआधी नवीन खंड (एक) घातला (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ७ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ११ द्वारे मूळ खंड (१) ऐवजी घातले (भूतलक्षी प्रभावाने).

४. १९५८ चा अधिनियम ३१-कलम १० द्वारे बाब (२-क्) ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून). मूळ बाब २-क ही १९५७ चा अधिनियम १६-कलम ३ द्वारे घातली होती.

५. १९६१ चा अधिनियम १४-कलम १४ द्वारे "१२" ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६१ रोजी व तेव्हापासून).

(तीन) मोठ्या व लहान प्राण्यांची कातडी--मग ती बिनकमावलेली असो वा कमावलेली असो ;

[1][ (चार) लोखंड व पोलाद म्हणजे--

(एक) बीड व ओतीव लोखंड--यामध्ये तुलिका, बैठकपट्ट, लोखंडाची मोड, ओतीव लोखंडाची मोड, देठातील मोड, ओतीव लोखंडाच्या पापुद्रयांची मोड यांचा समावेश आहे ;

(दोन) निमपोलाद (सर्व प्रतींच्या, आकारांच्या व आकारमानांच्या लगडी, ढापे, गड्डे व ओंडे) ;

(तीन) नळकांडी गज, कथली गज, लाटीव गज, कुदळी गज, सिलिपाट गज ;

(चार) पोलादी गज (गोलाकार, दंडाकार, चौरस, चपटे, अष्टकोनी, षट्कोनी, नितळ व वळीदार किंवा पीळदार, वेटोळ्याच्या आकाराचे व तसेच उजू प्रकारचे) ;

(पाच) पोलादी बांधकामसामग्री (कोणायन, बरगे, पन्हळ, टी-पाइप, पाटसोट छेद, झेड् छेद किंवा अन्य कोणतेही लाटीव छेद) ;

(सहा) पत्रे, छरपट्ट्या, पट्टे, नळकांडी--बिनजस्ताचे व जस्ताळलेले, गरम व थंड लाटीव नितळ व पन्हळीदार, सर्व प्रतींचे, उजू प्रकारचे व वेटोळ्याच्या आकाराचे, लाटीव व रिबिट केलेले असे दोन्ही प्रकारचे ;

(सात) सर्व प्रतींचे नितळ व खवलेदार पट्ट ;

(आठ) चकत्या, कडी, घडकाम व पोलादी ओतकाम ;

(नऊ) हत्यारोपयोगी, हीणवट किंवा वरीलपैकी कोणत्याही वर्गातील विशेष प्रकारचे पोलाद ;

(दहा) पोलादाचा रस गाळताना राहिलेली सर्व प्रकारची मोड--धातुरसाचे पापुद्रे, कातकामाचा व कोरणकामाचा कचरा धरून ;

(अकरा) सर्व व्यासांच्या व लांबींच्या सांधीव व बिनसांधीव पोलादी नळ्या--त्यामध्ये नळ्यांच्या जोडकामाचे साहित्यही समाविष्ट आहे ;

(बारा) विद्युतप्रभारित द्रवात बुचकळून काढलेले किंवा विद्युत-अपघटनी प्रकारचे कल्हई काढलेले पट्ट किंवा बिनकल्हईचे पट्ट ;

(तेरा) फिशप्लेटचे (सांधपट्ट्यांचे) गज, धारणपाटाचे गज, रुळांमध्ये आडव्या घालावयाच्या सिलिपाटाचे गज, फिशप्लेटस्, धारणपाट, रुळांमधील आडवे सिलिपाट, दाब दिलेले पोलादी सिलिपाट, रूळ--अवजड व हलके क्रेन रुळ ;

(चौदा) चाके, टायर्स, आसदंड, चाकमांडण्या ;

(पंधरा) तारदंड व तारा--लाटीव, ओढीव, जस्ताचा, अल्युमिनिअमचा किंवा कथलाचा मुलामा दिलेल्या अथवा तांब्यासारखे कशाचे तरी पुट दिलेल्या ;

(सोळा) वरीलपैकी कोणत्याही वर्गातील सदोष, टाकून दिलेले, कातरलेले किंवा टोकाचे तुकडे ; ]

[1][ (पाच) ताग म्हणजे कोर्कोरस कॅप्सुलरीज (Corchorus capsularies) व कोर्कोरस ओलिटोरिअस् (Corchorus olitorius) या जातीच्या वनस्पतींपासून काढलेले तंतू आणि हिबिस्कस कॅनाबिनस (Hibiscus cannabinus) व हिबिस्कस सब्दरिफा व्हॅरत्तिसिमा (Hibiscus sabdariffa--Varaltissima) या जातीच्या वनस्पतींपासून काढलेले 'मेस्ता' किंवा 'बिमली' म्हणून ओळखले जाणारे तंतू आणि क्रोटॅलॅरिआ जन्सीआ (Crotalaria juncea) या जातीच्या वनस्पतींपासून काढलेले 'सण' किंवा 'अंबाडी' म्हणून ओळखले जाणारे तंतू--मग त्यांचे गठ्ठे बांधलेले असोत वा नसोत ; ]

[1][ (सहा) गळिताची धान्ये म्हणजे--

(एक) भुईमूग किंवा शेंगदाणा (Arachis hypogaea) ;

(दोन) तीळ (Sesamum orientale);

(तीन) सरकी (Gossypium Spp.);

(चार) सोयाबीन (Glycine seja);

(पाच) शिरसबी किंवा मोहरी--

(एक) तोर्ता (Brassica campestris var toria)

(दोन) राई (Brassica juncea);

(तीन) जंबा--तारामिरा (Eruca Satiya);

(चार) सरसों--पिवळी व तांबूस (Brassica campestris var. Sarson);

(पाच) बनारसी राई किंवा अस्सल राई (Brassica nigra);

---

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

(सहा) जवस (Linum usitatissimum);

(सात) एरंडी (Ricinus communis);

(आठ) नारळ (म्हणजे कोवळे नारळ वगळून खोबरे) (Cocos nucifera);

(नऊ) सूर्यफूल (Helianthus annus);

(दहा) कारळा तीळ (काळे रामतीळ) (Guizotia abyssinica);

(अकरा) निंब, वेपा (Azadirachta indica);

(बारा) मोह, इल्लुपई, इप्पे (Madhuca indica M. Latifolia, Bassia Latifolia and Madhuca longifolia syn. M., Longifolia);

(तेरा) करंजा, पोंगम, होंगा (Pongamia pinnata syn. P. Glabra);

(चौदा) कुसुम (Schleichera oleosa, syn. S. Trijuga);

(पंधरा) पुन्ना, उंडी (Calophyllum inophyllum);

(सोळा) कोकम (Carcinia indica);

(सतरा) साल (Shorea robusta);

(अठरा) तुंग (Aleurites fordii and A. montana);

(एकोणवीस) रेड पाम (Elaeis guinensis);

(वीस) कुसुंब करडई (Carthanus tinctorius); ]

[१][ (सहा-क) कडधान्ये म्हणजे—

(एक) हरभरा किंवा गुलाबी चणा (Cicerarietinum L.);

(दोन) तूर किंवा अरहर (Cajanus cajan);

(तीन) मूग (Phaseolus aureus);

(चार) मसूर (Lens esculenta Moench, Lens culinaris Medic.);

(पाच) उडीद (Phaseolus mungo);

(सहा) मोट (Phaseolus aconitifolius Jacq)

(सात) लाखेची किंवा केशरी डाळ (Lathyrus sativus L.); ]

[७][ (सात) 'केंद्रीय उत्पादनशुल्क व मीठ अधिनियम, १९४४' (१९४४ चा १) याच्या पहिल्या अनुसूचीतील बाब क्रमांक [३][२२] यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे रेयॉन किंवा कृत्रिम रेशमी कापड;

(आठ) 'केंद्रीय उत्पादनशुल्क व मीठ अधिनियम, १९४४' (१९४४ चा १) याच्या पहिल्या अनुसूचीतील बाब क्रमांक [४][१] यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे साखर ;

(नऊ) 'केंद्रीय उत्पादनशुल्क व मीठ अधिनियम, १९४४' (१९४४ चा १) याच्या पहिल्या अनुसूचीतील बाब क्रमांक [५][४] यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे तंबाखू;

(दहा) 'केंद्रीय उत्पादनशुल्क व मीठ अधिनियम, १९४४' (१९४४ चा १) याच्या पहिल्या-अनुसूचीतील बाब क्रमांक [६][२१] यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे लोकरी कापड.]

[२]* * * * *

[८][घोषित मालाची राज्यांतर्गत विक्री किंवा खरेदी यांवरील कराच्या संबंधातील निर्बंध व शर्ती.]

[८][१५. राज्याचा प्रत्येक विक्रीकर कायदा घोषित मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर कर बसवत असेल किंवा बसवण्यास प्राधिकृती देत असेल तेथवर, तो खालील निर्बंधांस व शर्तीस अधीन असेल, ते असे—

(क) अशा मालाच्या राज्यांतर्गत झालेल्या कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत त्या कायद्याखाली प्रदेय असणारा कर त्यांच्या विक्री किंवा खरेदी किंमतीच्या [९][तीन टक्क्यांहून]अधिक असणार नाही आणि असा कर एकापेक्षा अधिक टप्प्यांवर बसवला जाणार नाही;

---

१. १९७६ चा अधिनियम १०३-कलम ७ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६८ चा अधिनियम १९-कलम ४३ द्वारे बाब क्रमांक (अकरा) वगळली (११ मे, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९६१ चा अधिनियम १४-कलम १४ द्वारे "१२ क" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६१ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम १४ द्वारे "८" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६१ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम १४ द्वारे "९" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६१ रोजी व तेव्हापासून).

६. कित्ता—कलम १४ द्वारे "१२ ख" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६१ रोजी व तेव्हापासून).

७. १९५८ चा अधिनियम ३१-कलम १० द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

८. कित्ता—कलम ११ द्वारे पूर्वीच्या कलम १५ ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

९. १९६६ चा अधिनियम १३-कलम ५१ द्वारे 'दोन टक्के' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ जुलै, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(ख) जर कोणत्याही घोषित मालाच्या राज्यांतर्गत विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत त्या कायद्याखाली कर बसवलेला असून, असा माल आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात विकलेला असेल [1][आणि आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात अशा मालाच्या विक्रीबाबत या अधिनियमाखाली कर भरलेला असेल तर, अशा कायद्याखाली बसवलेल्या कराची] [2][प्रतिपूर्ती आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात अशी विक्री करणाऱ्या व्यक्तीला] त्या राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये उपबंधित केले असेल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीनतेने करण्यात येईल;

[3][(ग) जेव्हा कलम १४ खालील खंड (एक)-उपखंड (एक) यामध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही धानाच्या/साळीच्या/भाताच्या राज्यांतर्गत झालेल्या विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत त्या कायद्याखाली कर बसवलेला असेल तेव्हा, अशा धानापासून पैदा केलेल्या तांदुळावर बसणाऱ्या करामधून अशा धानावर बसवलेली कराची रक्कम कमी केली जाईल;

(घ) कलम १४-खंड (सहा-क) मध्ये निर्देशिलेल्या कडधान्यांपैकी प्रत्येक कडधान्य—मग ते अख्खे असो वा डाळीच्या स्वरूपातील असो किंवा सालासकट [असो वा सालाशिवाय असो—त्या कायद्या-खाली कर बसवण्याच्या प्रयोजनार्थ एकच जिन्नस म्हणून समजले जाईल.] [4]

## प्रकरण ५ वे

### विशेष प्रकरणांतील दायित्व

[4][१६. या प्रकरणात— [4][व्याख्या].

(क) "समुचित प्राधिकरण" याचा कंपनीच्या संबंधातील अर्थ, कंपनीवरील कर निर्धारित करण्यास सक्षम असलेले प्राधिकरण असा आहे ;

(ख) "कंपनी" व "खाजगी कंपनी" यांना 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा ४)-कलम ३-पोटकलम (१) च्या खंड (एक) व खंड (तीन) मध्ये त्यांना नेमून दिलेल्याप्रमाणे ते ते अर्थ आहेत.

१७. (१) जी जी व्यक्ती— समापन-अवस्थेतील कंपनी.

(क) न्यायालयाच्या आदेशाखाली किंवा अन्यथा परिसमापित करण्यात येत असलेल्या कोणत्याही कंपनीची समापक आहे; किंवा

(ख) एखाद्या कंपनीच्या कोणत्याही मत्तेची प्रापक म्हणून नियुक्त झालेली आहे,

ती प्रत्येक व्यक्ती (यात यापुढे 'समापक' म्हणून निर्देशिलेली) अशी समापक झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत तिच्या अशा नियुक्तीचे वृत्त समुचित प्राधिकरणाला कळवील.

(२) समुचित प्राधिकरण त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करून किंवा माहिती मागवून नतर समापकाला, त्या समापकाच्या नियुक्तीची नोटीस स्वतःला मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, समुचित प्राधिकरणाच्या मते कंपनीकडून जो कर त्यावेळी प्रदेय असेल किंवा त्यानंतर प्रदेय होणे संभवनीय असेल अशा कोणत्याही कराची तरतूद करण्यास पुरेशी असेल अशी रक्कम सूचित करील.

(३) पोटकलम (२) खाली समापकाला समुचित प्राधिकरणाकडून सूचना मिळेपर्यंत तो आपल्या हाती असलेली कंपनीची कोणतीही मत्ता किंवा संपत्ती यांवरील ताबा सोडणार नाही आणि याप्रमाणे सूचना मिळाल्यानंतर तो सूचित केलेल्या रकमेइतकी रक्कम बाजूला काढून ठेवील आणि अशी रक्कम बाजूला काढून ठेवेपर्यंत तो आपल्या हाती असलेली कंपनीची कोणतीही मत्ता किंवा संपत्ती यांवरील ताबा सोडणार नाही :

परंतु, न्यायालयाच्या कोणत्याही आदेशानुसार किंवा या अधिनियमाखाली कंपनीकडून प्रदेय असणारा कर देण्याच्या प्रयोजनार्थ किंवा समापनाच्या दिनांकी शासनाला येणे असलेल्या ऋणांअगोदर आपल्या ऋणांची फेड करवून घेण्यास जे कायद्यान्वये हक्कदार आहेत त्या प्रतिभूत धनकोंना कोणतेही प्रदान करण्यासाठी किंवा समुचित शासनाच्या मते वाजवी असेल असा कंपनीच्या परिसमापनाचा खर्चवेच भागवण्यासाठी अशा मत्तेवरील किंवा संपत्तीवरील ताबा सोडण्यास समापकाला या पोटकलमातील कोणतीही गोष्ट प्रतिबंधक ठरणार नाही.

---

१. १९७२ चा अधिनियम ६१-कलम १२ द्वारे " तर असा बसवलेला कर" याऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १२ द्वारे "अशा व्यक्तीला परत केला जाईल" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम १०३-कलम ८ द्वारे घातले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८)-कलम २ व अनुसूची एक यांद्वारे कलम १६ हे निरसित केलें होते, त्याजागी १९७२ चा अधिनियम ६१-कलम १३ द्वारे नव्याने हा मजकूर घातला (१ एप्रिल, १९७३ रोजी व तेव्हापासून).

(४) जर समापक पोटकलम (१) अनुसार नोटीस देण्यास चुकला अथवा पोटकलम (३) च्या उपबंधांनुसार आवश्यक केल्याप्रमाणे ती रक्कम बाजूला काढून ठेवण्यास चुकला किंवा त्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून त्याने कंपनीच्या कोणत्याही मत्तेवरील किंवा संपत्तीवरील ताबा सोडला तर, कंपनी जो कर देण्यास दायी होऊ शकेल तो देण्यासाठी तो व्यक्तिशः दायी होईल :

परंतु, कंपनीकडून प्रदेय असणाऱ्या कराची रक्कम पोटकलम (२) खाली सूचित केलेली असल्यास समापकाचे त्या पोटकलमाखालील व्यक्तिगत दायित्व तेवढ्या रकमेपुरतेच राहील.

(५) जेथे एकापेक्षा अधिक समापक असतील तेथे, या कलमाखाली समापकाशी संलग्न असणारी आबंधने व दायित्वे ही सर्व समापकांशी समूहशः व व्यक्तिशः संलग्न होतील.

(६) या कलमाचे उपबंध, त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये त्यांच्या विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, अंमलात येतील.

**समापन-अवस्थेतील खाजगी कंपनीच्या संचालकांचे दायित्व.**

१८. 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा कोणतीही खाजगी कंपनी या अधिनियमाच्या प्रारंभानंतर परिसमापित केलेली असेल, आणि त्या कंपनीवर कोणत्याही कालावधीसाठी मग—तो तिच्या समापनाच्या पूर्वीचा असो, समापन चालू असतानाचा असो किंवा त्यानंतरचा असो—या अधिनियमाखाली आकारलेल्या कराची वसुली होणे शक्य नसेल तेव्हा, ज्या कालावधीचा कर देय असेल अशा कोणत्याही कालावधीमध्ये जी जी व्यक्ती त्या खाजगी कंपनीची संचालक होती ती प्रत्येक व्यक्ती, कंपनीच्या कारभारासंबंधात आपल्याकडून कोणत्याही प्रकारे उघडउघड हलगर्जीपणा, गैर तऱ्हेची कृती किंवा कर्तव्यभंग झाला याच्याशी वसुली न होण्याचा कारणसंबंध जोडता येणार नाही असे तिने शाबीत केले नाही तर, संयुक्तपणे व व्यक्तिशः असा कर देण्यास दायी होईल.]

# THF CENTRAL SALES TAX ACT, 1956

## केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adventure | प्रोद्यम | [S. 2(aa)(i)] |
| aggregate of sale prices | विक्रीच्या किंमतींची एकवट | [S. 8A(1)(a)] |
| appropriate authority | समुचित प्राधिकरण | [S. 16(a)] |
| assessing authority | निर्धारण प्राधिकारी | [S. 6A(2)-expl.] |
| broker | दलाल | [S. 2(b)(ii)] |
| collection | उगराणी | [S. 9-m.n.] |
| commission agent | कमिशन एजंट | [S. 2(b)(ii)] |
| company in liquidation | समापना-अवस्थेतील कंपनी | [S. 17-m.n.] |
| composition | घटना | [S. 14(iic)] |
| concern | कार्यसंस्था | [S. 2(aa)(i)] |
| customs frontiers | सीमाशुल्क सरहद्दी | [S. 2(a)(b)] |
| dealer | व्यापारी | [S. 2(b)] |
| declaration | अधिकथन | [S. 8(4)(a)] |
| declared goods | घोषित माल | [S. 2(c)] |
| deferred payment | आस्थगित प्रदान | [S. 2(g)] |
| *del credere* agent | हमीदारी एजंट | [S. 2(b)(ii)] |
| enforcement (of tax) | (कराची) सक्तीची वसुली | [S. 9(2A)] |
| factor | वखारिया | [S. 2(b)(ii)] |
| form | नमुना | [S. 7(3C)] |
| forms | प्रपत्रे | [S. 7(3F)] |
| formulate principles | तत्त्वे सूत्रबद्ध करणे | [Long title] |
| general sales tax law | सर्वसाधारण विक्रीकर कायदा | [S. 2(i)] |
| goods | माल | [S. 2(d)] |
| hides and skins | मोठ्या व लहान प्राण्यांची कातडी | [S. 14(iii)] |
| in the course of inter-State trade or commerce | आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात | [S.8(1)] |
| levy | बसवणे | [S. 9-m.n.] |
| movement of goods | मालाची ने-आण | [S. 3(a)] |
| place of business | धंद्याची जागा | [S. 2(dd)] |
| practice | शिरस्ता | [S. 2(h)] |
| property in goods | मालातील मालकीहक्क | [S. 2(g)] |
| recovery | वसुली | [S. 9(2)] |
| registered dealer | नोंदलेला व्यापारी | [S. 2(f)] |
| rounding off | पूर्णांकित करणे | [S. 9B] |
| sale price | विक्रीची किंमत | [S. 2(h)] |
| sales tax law | विक्रीकर कायदा | [S. 2(i)] |
| surety | जामीनदार | [S. 7(3C)] |
| surety bond | जामीनखत | [S. 7(3C)] |
| turnover | उलाढाल | [S. 2(j)] |
| wind up | परिसमापित करणे | [S. 18] |

# केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६

# THE CENTRAL SALES TAX ACT, 1956

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकथन | declaration | [S. 8(4)(a)] |
| आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य-व्यवहार यांच्या ओघात | in the course of inter-State trade or commerce | [S. 8(1)] |
| आस्थगित प्रदान | deferred payment | [S. 2(g)] |
| उगराणी | collection | [S. 9-m.n.] |
| उलाढाल | turnover | [S. 2(j)] |
| कमिशन एजंट | commission agent | [S. 2(b)(ii)] |
| कार्यसंस्था | concern | [S. 2(aa)(i)] |
| घटना | composition | [S. 14(iic)] |
| घोषित माल | declared goods | [S. 2(c)] |
| जामीनखत | surety bond | [S. 7(3C)] |
| जामीनदार | surety | [S. 7(3C)] |
| तत्त्वे सूत्रबद्ध करणे | formulate principles | [Long title] |
| दलाल | broker | [S. 2(b)(ii)] |
| धंद्याची जागा | place of business | [S. 2(dd)] |
| नमुना | form | [S. 7(3C)] |
| निर्धारण प्राधिकारी | assessing authority | [S. 6A(2)-expl.] |
| नोंदलेला व्यापारी | registered dealer | [S. 2(f)] |
| परिसमापित करणे | wind up | [S. 18] |
| पूर्णांकित करणे | rounding off | [S. 9(b)] |
| प्रपत्रे | forms | [S. 7(3F)] |
| प्रोद्यम | adventure | [S. 2(aa)(1)] |
| बसवणे | levy | [S. 9-m.n.] |
| माल | goods | [S. 2(d)] |
| मालाची ने-आण | movement of goods | [S. 3(a)] |
| मालातील मालकीहक्क | property in goods | [S. 2(g)] |
| मोठ्या व लहान प्राण्यांची कातडी | hides and skins | [S. 14(iii)] |
| वखारिया | factor | [S. 2(b)(ii)] |
| वसुली | recovery | [S. 9(2)(i)] |
| विक्रीकर कायदा | sales tax law | [S. 2(d)] |
| विक्रीच्या किंमतींची एकवट | aggregate of sale prices | [S. 8A(1)(a) |
| विक्रीची किंमत | sale price | [S. 2(h)] |
| व्यापारी | dealer | [S. 2(b)] |
| शिरस्ता | practice | [S. 2(h)] |
| (कराची) सक्तीची वसुली | enforcement ( of tax ) | [S. 9(2A)] |
| समापन-अवस्थेतील कंपनी | company in liquidation | [S. 17-m.n.] |
| समुचित प्राधिकरण | appropriate authority | [S. 16(a)] |
| सर्वसाधारण विक्रीकर कायदा | general sales tax law | [S. 2(i)] |
| सीमाशुल्क सरहद्दी | customs frontiers | [S. 2(a)(b)] |
| हमीदारी एजंट | *del credere* agent | [S. 2(b)(ii)] |